स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

सामाजिक शास्त्र विद्याशाखेच्या समाजशास्त्र विषयात पी.एच.डी.

पदवीसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला सादर

करावयाचा संशोधन आराखडा

‘‘ पुणे जिल्हयातील वृदधाश्रम आणि वृदधांचा समाजशास्त्रीय

अभ्यास ’’

<u>संशोधक विद्यार्थी</u>

कल्याणकर - धुमाळ अपर्णा विश्वनाथ

मु.पो. बारामती , ता.बारामती , जि. पुणे.

<u>संशोधन मार्गदर्शक</u>

डॉ. घायाळ एस.पी.

स्वामी विवेकानंद महाविद्यालय

शिरूरताजबंद जि. लातुर

२०१९

पुणे जिल्हयातील वृध्दाआश्रम आणि वृध्दांचा समाजशास्त्रीय अभ्यास

➢ प्रस्तावना

सामाजिक समस्या मानवी समाजाइतक्यातच प्राचीन आहेत. मानवी समाजात असा कोणताही कालखंड नाही की ज्या काळात सामाजिक समस्या अस्तित्वात नव्हत्या. सामाजिक समस्या सार्वत्रिक असल्या तरी स्थलकालानुसार यांचे स्वरूप वेगवेगळे दिसुन येते.सामाजिक समस्या मानवी जीवनाचे तसेच समाजाचेही विघटन घडवून आणत असल्यामुळे त्यांचे उच्चाटन करणे किंवा त्यांच्यावर प्रतिबंध ठेवणे आवश्यक असते. समाजापुढे ते एक आव्हानच असते. त्यामुळे समस्यांच्या निराकरणासाठी वेगवेगळया उपाययोजना आखल्या जातात.

भारतात एकोणीसाव्या शतकात अनेक जाचक रूढी परंपरा समाजात येत होत्या. त्यांच्या निराकरणासाठी विविध चळवळी सुरू झाल्या. चळवळीद्वारे अनेक समस्यांचे निराकरणही झाले. जसे सतिप्रथा, केशवपन, बालविवाह, बालजरठ विवाह इत्यादी परंतू त्याचबरोबर अनेक नव्या सामाजिक समस्यांची निर्मितीही झाली. अशा अनेक समस्यांपैकी वृध्दांचा प्रश्न ही देखील आज एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे.

➢ समस्या सुत्रन :-

आधुनिक समाजातील गुंतागुत दिवसेंदिवस वाढत चालली आहे, अनेक समस्या नव्याने उदयास येत आहेत. हया समस्यांची सोडवणूक करून समाजाची पुनर्निर्मिती करण्यासाठी समाजाला योग्य दिशा देण्याचे काम समाजशास्त्राचे अभ्यासक करत आहेत.

एकटेपणा अनुभवणा-या आणि भावनिक आधार शोधणा-या वृध्दांचे प्रमान दिवसेंदिवस वाढत असलेले दिसून येते. वृध्द हा समाजाचा अविभाज्य घटक आहे. तो प्रगल्भ, परिपक्व, समृध्द, अनुभवांचा खजिना आहे. त्यांचा योग्य प्रकारे उपयोग केला गेला तर समाजाला सर्वांगीण विकास होईल.

परंतु वृध्दांना इतरांच्या आधाराची गरज असते आज एकटया राहणा–या वृध्दांच्या परिस्थितीचा फायदा घेउन त्यांच्यावर होणा–या अत्याचारांचे व हल्यांचे प्रमाण वाढले आहे. वृध्दांना त्यांच्या आजारपणाच्या काळात किंवा अन्य कारणांसाठी इतरांच्या मदतीची गरज असते, पंरतू अशा प्रसंगी क्वचितच इतर व्यक्ती त्यांना मदत करतात. तसेच वृध्दांच्या नावे असणारी मालमत्ता, बॅंकेतील शिल्लक हया संबंधी कायदेशीर माहिती नसल्यामुळे अनेक वेळा त्यांच्या जीवाला धोका निर्माण होत असतो. अशा वेळी त्यांना संरक्षण मिळण्याची गरज असते. त्यांना भेडसावणा–या समस्यांच्या निराकरणासाठी आवश्यक त्या सेवा पुरण्याची आवश्यकता भासते. जिथे –जिथे समस्यांनी गंभीर रूप धारण केले तिथे सेवांची पूर्तता शासनांने केलेली आहे किंवा ती करणे ही त्यांची जबाबदारी म्हणून स्विकारली आहे. पण त्याचबरोबर ती एक सामाजिक बांधीलकी म्हणून समाजाची जबाबदारी आहे. त्यामुळे एकटया राहणा–या वृध्दांच्या परिस्थितीचे विश्लेषण करणे, त्यांच्या समस्यांचा शास्त्रीय अहापोह करणे हे तितके अनिवार्य तितकेच या समस्यांवर उपचारात्मक व प्रतिबंधात्मक पर्यांयांचा सखोलपणे विचार करणेही अधिक महत्वाचे आहे. या दृष्टीनेच सदर विषयाची निवड अध्यायणासाठी करणात आली आहे.

➢ संबंधित साहित्याचा वाड्.मयीन आढावा

वृध्दांच्या प्रश्नाची गंभीरता लक्षात घेउन संशोधन विषयाच्या अनुशंगाने वृध्दांच्या प्रश्नाशी निगडीत विविध ग्रंथ तसेच संबंधीत साहित्याचे परिक्षण पुढील प्रमाणे केल आहे.

१. नार्वेकर राधाकृष्ण यांचे सेवानिवृत्त झालात ! पुढे काय?

हे पुस्तक २००२ साली प्रसिध्द झाले. या पुस्तकातही लेखकाने कुटुंबाची व्यवहार चालतात ते कुटुंब प्रमुखाच्या इच्छेनुसार कुटुंबात निरनिराळया वयोगटाची, भिन्नभिन्न स्वभावाची, बौध्दीक पातळीची , वेगवेगळया आवडी निवडी असणारी माणसे एकत्र नांदत असतात. ‘व्यक्ती तितक्या प्रवृत्ती’ हया उक्तीप्रमाणे भिन्नभिन्न स्वभावाची माणसे एकत्र आली की, त्यांच्यात संघर्ष होणारच व हे संघर्ष तात्पुरते व क्वचितच असले तर त्याचा फारसा परिणाम कौंटुबिक संतुलनावर होत नाही. पंरतु घरातील वृध्दांचे आजारपण, शुश्रूषा

बहुतेक वेळेला घरच्या मंडळीकडून, जवळच्या नातेवाईकांकडूनच केली जाते. त्यामुळे कुटुंबाचे संतुलन हे कौटुंबिक व सामाजिक सुरक्षेच्यादृष्टीने महत्वाचे ठरते हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न या पुस्तकाद्वारे करण्यात आला आहे.

२.<u>देशपांडे वसंत यांचे, 'पंचवीशी ते पंचाऐशी '</u>

हे पुस्तक २००५ साली प्रकाशीत झाले. हया पुस्तकात ते म्हणतात की, आजच्या कुटुंबामध्ये टि.व्ही. व संगणक हयांनी कब्जा केलेला दिसतो. व्यक्ती हया दोन माध्यमांच्या इतक्या अधिन झाल्या आहेत की, कोणालाही घरातल्या माणसाशी सुसंवाद साधायला वेळ मिळत नाही. तसेच हल्ली पती-पत्नी त्यांच्या व्यावसायिक जबाबदा-यांमध्ये इतक्या गुंतल्या आहेत की, मुले नकोच ही नवीन कल्पनाही मुळ धरू लागली आहे. पती-पत्नी परस्पर विचाराने असा निर्णय घेतात. क्वनइसम प्दबवउम रू छव ज्ञपके ख्क्प्छ्ज्ञ, ची संकल्पना आणि तीचा स्वीकार करणारी जोडपी तसेच स्पअम पद त्मसंजपवद वर राहणारे लिव्हिंग पार्टनर हळूहळू वाढु लागली आहेत. अशा परिस्थितीत ब-याच वृध्दांना पुढील काळात बदलत्या वातावरणाशी व काळाशी जळवून घेणे अधिक कठीण होउ लागले वृध्दांची काळजी घेणे दुरच पण त्याच्यांशी बोलण्यास वेळ मिळणेही अशक्य होवू लागले आहे. त्यामुळेच या पुस्तकांतुन मिळणा-या माहिती द्वारे वृध्द व तरूण नक्कीच भावी काळात होणा-या गंभीर परिस्थितीविषयी जागरूक होतील असे वाटते.

➢ <u>विषय निवडीचे कारण :</u>

वृध्दावस्थेत जाणवणारा एकाकीपणा किंवा एकटेपणा ही कल्पना तशी पाश्चात्य समाजात नवी नाही. परंतू अलीकडे विकसनशील देशीत तंत्रविज्ञान, विज्ञान आणि प्रसारमाध्यमे यांच्या विकासाबरोबर एकाकी राहणा-या वृध्दांचे प्रमाण आपल्या देशातही वाढत चाललेले दिसुन येत आहे. वृध्दांनाही होणा-या परिवर्तनाचा स्वीकार केला आहे. परंतू अनेक जण हयांचा दोष मुलांना देतात. आज अनेक वृध्द स्वखुशीने तर काही

नाईलाजाने एकाकी राहणे पसंत करतात. एकटे राहून जिव्हाळयाचे नाते वृध्द व्यक्ती कसे जूळवून आहेत, एकटे राहताना त्यांना कोणकोणत्या समस्या भेडसावतात, आपल्या मुलाशी त्यांचे नाते कसे आहे, त्यांचा आर्थिक भार ते कसे उचलतात ज्यांना मुले-बाळे नाहीत ते कसे जीवन जगतात, वृध्दांच्या समाजाकडून व शासनांकडून काय अपेक्षा आहेत, एकटे राहताना ते परिस्थितीशी कसे जुळवून घेतात इत्यादी सर्व बाबींचा मागोवा घेण्यासाठी मी या विषयावर संशोधन करण्याचे ठरविले.

➢ संशोधनाची उद्‌दिष्टे :-

पुणे जिल्हयातील वृध्दाश्रम आणि वृध्दांचा अभ्यास करण्यासाठी पुढील उद्‌दिष्टे विचारात घेतली जातील.

१.वृध्दाश्रमाची संकल्पना जाणून घेणे.

२.वृध्दाची वैयक्तिक , सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी जाणून घेणे.

३.वृध्द व्यक्तींचे त्यांच्या कुटुंबाशी , नातेवाईकांशी व इतर व्यक्तींशी असणारे संबंध जाणून घेणे.

४.वृध्दांना दैनंदिन जीवनात सामोरे जाण्या लागणा-या समस्यांची माहिती करून घेणे व त्या अनुषंगाने उपाय योजना सुचविणे.

५.वृध्दाश्रमात दाखल होणा-या वृध्दांची वृध्दाश्रमात येण्यामागची कारणे जाणून घेणे.

६. वृध्दांच्या वृध्दाश्रमाबद्‌दल आणि एकूण समाजाबद्‌दलच भावना , मते आणि अभिवृत्ती जाणून घेणे.

७. वृध्दांच्या मानसिक व आरोग्यविषयक समस्यांचा अभ्यास करणे.

८. वृध्दांचा वृध्दात्वाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे याचा अभ्यास करणे.

६. वृध्दांसाठी राबवण्यात येणा-या सरकारी आणि निमसरकारी योजना व उपक्रमाचा अभ्यास करणे.

➢ संशोधनाची गृहीतके:-

संशोधन करण्यामागचा उद्देश स्पष्ट झाल्यानंतर संशोधनाला योग्य दिशा मिळावी हया दृष्टीने खालील गृहीतकृत्यांचा आधार घेण्यात येणार आहे.

१. वृध्दांना त्यांच्या दैनंदिन जीवनात अनेक समस्यांना आणि ताण-तणावांना सामोरे जावे लागते.

२. वृध्दांची कुटुंबाप्रती , समाजाप्रती व शासनाप्रती असलेली मानसिकता नकारात्मक होवू लागली आहे.

३. संयुक्त कुटुंबाच्या विघटनातुन वृध्दांच्या समस्या निर्माण होत आहेत.

४. कुटुंबातील कर्त्या महिलांच्या अर्थाजनातील वाढत्या सहभागामुळे वृध्दांकडे दुर्लक्ष होत आहे.

५. वृध्दाश्रम ही एक संयुक्त कुटुंबास पुरक संस्था म्हणून उदयास येत आहे.

➢ संशोधन क्षेत्र व नमुना निवड:-

पुणे जिल्हयातील वृध्दाश्रम आणि वृध्दांचा अभ्यास करताना पुणे जिल्हा हा निवडला आहे हा अभ्यास करत असताना पुणे जिल्हयात अस्तित्वात असलेल्य वृध्दाश्रमापैकी ठराविक अशा वृध्दाश्रमाची निवड साधा याद्राच्छिक पद्धतीने केली जाईल. तसेच निवडलेल्या वृध्दाश्रमातील वृध्दांची निवड स्तरीत नमुना निवड पद्धतीने करून सर्व स्तरांतील वृध्दांचा त्यात समावेश होईल याची काळजी घेतली जाईल.

➢ तथ्य संकलनाचे स्त्रोत :-

तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर केला जाणार आहे. प्राथमिक स्त्रोतांमध्ये एकाकी वृध्दांकडून माहिती मिळवण्यासाठी मुलाखत, अनुसुची तसेच सहभागी निरिक्षण हया तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

तर दुय्यम स्त्रोतांमध्ये वेगवेगळे ग्रंथ, नियतकालीके, इंटरनेट, वेबसाईट, तसेच प्रकाशित व अप्रकाशित शोधनिबंध हयांचा वापर करण्यात येणार आहे.

➢ तथ्याचे विश्लेषण :-

मुलाखत , अनुसुचीद्वारे जी माहिती संकलीत केली जाईल त्याचे विषयाच्या उद्दिष्टानुसार वर्गीकरण केले जाईल. तसेच जमा केलेल्या तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी वेगवेगळे आलेख व आकृत्या तसेच संख्याशास्त्रीय साधने याचा वापर केला जाईल.

➢ संशोधनाची व्याप्ती :-

सदर संशोधनाची व्याप्ती किंवा मर्यादा पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१.भौगोलिक व्याप्ती :-

वृध्दाश्रम आणि वृध्द यांचा अभ्यास करत असताना पुणे जिल्हयातील वृध्दाश्रम व वृध्द निवडले जातील. त्यामुळे पुणे जिल्हयापुरतेच हे संशोधन मर्यादित आहे.

२.कालात्मक व्याप्ती :-

पुणे जिल्हयातील वृध्दाश्रम आणि वृध्दांचा अभ्यास करत असताना १ जून, २०२० ते ३१ मे, २०२१ हा कालखंड विचारात घेण्यात येणार आहे.

३.कार्यात्मक व्याप्ती :-

पुणे जिल्हयातील वृध्दाश्रम आणि वृध्दांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातुन अभ्यास करणे हे संशोधनाचे महत्वाचे उद्‌दिष्टे आहे

या उद्‌दिष्टाला अनुसरून वृध्दांच्या समस्या कशा कमी करता येतील हे संशोधनाचे महत्वाचे कार्य आहे.

➢ अभ्यासाचे महत्व :-

या अभ्यासाचे महत्व प्रामुख्याने समाजातील शिक्षक, विद्यार्थी , विविध अधिकारी विविध सामाजिक संस्था, सरकार इत्यादी घटकांना वृध्दाश्रम व वृध्दांची परिस्थिती जाणून घेण्यासाठी होणार आहे.

➢ प्रकरणाची मांडणी

या संशोधन विषयाचा अभ्यास एकूण ६ प्रकरणात करण्यात येणार आहे त्याचे थोडक्यात स्पटीकरण पुढीलप्रमाणे

१. पुणे जिल्हयाचे सामाजिक व आर्थिक समालोचन :-

या प्रकरणात प्रामुख्याने पुणे जिल्हयाची सर्वसाधारण माहिती स्पष्ट केली जाईल त्यामध्ये प्रामुख्याने भौगोलिक माहिती, लोकसंख्याविषयक माहिती, कृषीविषयक माहिती, उदयोगविषयक माहिती इ. विविध बाबींची माहिती स्पष्ट केली जाईल.

२. प्रस्तावना :-

या प्रकरणात प्रामुख्याने वार्धक्याची संकल्पना, वार्धक्याचे प्रकार, वृध्दांच्या प्रश्नांना जबाबदार घटक, वृध्दांना जाणवणा-या समस्या, वृध्दांचे हक्क, वृध्दांचे हक्कविषय तत्वे, वृध्दांसाठीचे राष्ट्रीय धोरण, महाराष्ट्र शासन आणि वृध्दाकरीता कल्याणकारी योजना, ज्येष्ठ नागरीकासांठी काम करणा-या संस्था,

वृध्द लोकसंख्येबाबत एक दृष्टीक्षेप इ. विविध बाबींचा माहिती स्पष्ट केली जाईल.

३. संशोधन पद्धती :-

या प्रकरणामध्ये प्रामुख्याने संदर्भ साहित्याचा आढावा, संशोधन विषयाची उद्दिष्टे, संशोधन विषयाची गृहितके, सैधांतीक पार्श्वभूमी, संशोधन विषयाचे महत्व , मर्यादा इ. बाबींची माहिती दिली जाईल.

४.वृध्दाश्रम :-

या प्रकरणात प्रामुख्याने वृध्दांच्या समस्या , वृध्दांच्या समस्या निर्मितीची कारणे, वृध्दाश्रमाची स्थापना, नोंदणी, उद्दिष्टे, व्यवस्थापन, व्यवस्थापन मंडळाचे कार्य इ. बाबींची माहिती स्पष्ट केली जाईल.

५. तथ्यांचे संकलन आणि विश्लेषण :-

या प्रकरणात प्रामुख्याने वृध्दांचे वयानुसार वर्गीकरण , लिंगभेदानुसार केलेले वर्गीकरण, धर्मानुसार वर्गीकरण, मातृभाषेनुसार वर्गीकरण, शैक्षणिक वर्गीकरण, वैवाहिक दर्जा, आपत्याचे वर्गीकरण, मुले भेटण्यास येण्याची वांरवारीता, निर्णयप्रक्रीयंतील सहभाग, आरोग्यविषयक स्थिती इ. बांबीचे स्पष्टीकरण केले जाईल.

६. उपसंहार आणि निष्कर्ष :-

या प्रकरणात पुणे जिल्हयातील वृध्दाश्रम आणि वृध्दांचा समाजशास्त्रीय अभ्यास यावरून जे निष्कर्ष निघतात ते निष्कर्ष व उपाययोजना यांचे विश्लेषण केले जाईल.

संशोधन मार्गदर्शक **संशोधक विद्यार्थी**

डॉ.घायाळ एस.पी. **कल्याणकर-धुमाळ अपर्णा विश्वनाथ**